महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११५ वे | दिनांक : २०/०४/२०२६ | वार सोमवार

# सरसंघचालकपदी महिलांना संधी देणार का? : विजय वडेट्टीवार यांचा सवाल



**मुंबई** : काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधारी भाजपत महिलांना दुय्यम स्थान दिले जात असल्याचा आरोप केला. भाजपने जे विधेयक आणले त्यात अनुसूचित जाती, जमाती विशेषत: ओबीसी महिलांच्या आरक्षणाची कोणतीही तरतूद नव्हती. मनुस्मृती मानणाऱ्या भाजपत महिलांना नेहमी दुय्यम स्थान दिले जाते, असे ते म्हणालेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची धुरा एखाद्या महिलेच्या हातात देणार का? असा प्रश्नही त्यांनी यावेळी संघाला केला.

विजय वडेट्टीवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशाला उद्देशून भाषण केले. ते भाषण देशाच्या पंतप्रधानांचे नव्हे, तर भाजपच्या नेत्याचे व आचारसंहितेचा भंग करणारे होते. महिला आरक्षणाच्या मुद्यावर बोलताना मोदींनी 50 हून अधिकवेळा काँग्रेसचे नाव घेतले. यावरून भाजपला काँग्रेसची किती भीती वाटते हे स्पष्ट होते. पंतप्रधानांचे भाषण राजकीय प्रचारासारखे होते. त्यांनी आचारसंहितेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत.

काँग्रेसने देशाला पहिली महिला राष्ट्रपती, पहिल्या महिला पंतप्रधान व पहिल्या महिला लोकसभा अध्यक्षा दिल्या आहेत. काँग्रेसनेच महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांत आरक्षण दिले. 2023 मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी मतदारसंघांची पुनर्रचना होईपर्यंत रोखून धरण्याचे कारण काय होते? सत्ता कायम आपल्या हाती ठेवण्याचा हा भाजपचा कुटिल डाव होता. तो विरोधकांनी हाणून पाडला, असे वडेट्टीवार म्हणाले.

भाजपने आणलेल्या विधेयकात अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी महिलांच्या आरक्षणाची कोणतीही तरतूद नव्हती. 33 टक्के आरक्षण देताना बहुजन समाजातील महिलांचा हक्क डावलून केवळ आपल्या मर्जीतील लोकांना सत्तेत बसवण्याचे ते षडयंत्र होते. मनुस्मृतीचा विचार मानणारी भाजप महिलांना आपल्या संघटनेत केवळ दुय्यम स्थान देते. ते संघाच्या प्रमुखपदी एखाद्या महिलेला नियुक्त करण्याचे धाडस दाखवणार का? भाजपचा देशाचा नकाशा बदलून संविधानावर हल्ला करण्याचा डाव होता. तो असफल ठरला, असेही विजय वडेट्टीवार यावेळी बोलताना म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सर्व नियम धाब्यावर बसवून उद्योग गौतम अदानींच्या घशात घालण्याचे काम सुरू असल्याचाही आरोप केला. देशातील रेल्वे, विमानतळ, वीज, सिमेंट, स्टील प्रकल्प हे सर्व नियम धाब्यावर बसवून अदानींच्या घशात घातले जात आहेत. देशातील जनता गरीब होत आहे. याउलट अदानी श्रीमंत होत आहेत. भाजप व अदानी एकमेकांना पुरक आहेत. ते देशाची लुट करत आहेत, असे ते म्हणाले.

भाजप पुरस्कृत भोंदूबाबा व धर्मांध शक्ती देशात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे महिलांच्या नावाखाली स्वत:ची सत्ता वाचवण्याचे प्रयत्न देशातील जागरूक महिलांना नक्कीच समजतील असा आम्हाला विश्वास आहे. अत्याचार व शोषणाच्या घटनेत जात-धर्म शोधणे घृणास्पद आहे. दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या नवनीत राणा व डॉक्टरी पेशाला काळीमा फासणारे डॉक्टर अनिल बोंडे यांच्यावर तातडीने गुन्हे दाखल केले पाहिजे, असेही वडेट्टीवार यावेळी बोलताना म्हणाले.

# जमिनीच्या वादातून सख्ख्या चुलत्याने २१ वर्षीय पुतण्याचा काटा काढला



**धाराशिव** : जिल्ह्यातील खामसवाडी परिसरात माणुसकीला काळिमा फसणारी घटना उघडकीस आली आहे. केवळ जमिनीच्या वादातून एका सख्ख्या चुलत्याने आपल्या २१ वर्षांच्या पुतण्याचा खून केला आहे. विलास शेळके असे आरोपीचे नाव असून त्याने सुजित शेळके या तरुणावर चाकूने वार करत जीव घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विलास शेळके आणि त्याचा पुतण्या सुजित शेळके यांच्या कुटुंबात जमिनीच्या व्यवहारावरून मागील अनेक दिवसांपासून धुसफूस सुरू होती. याच वादातून विलासच्या मनात सुजितबद्दल कमालीचा द्वेष निर्माण झाला होता, ज्याचे पर्यावसान अखेर एका भीषण घटनेत झाले. रात्री साडेदहाच्या सुमारास हा जुना वाद उफाळून आला आणि रागाच्या भरात विलासने पुतण्यावर हल्ला चढवला, ज्यामुळे या कौटुंबिक वादाचा अंत एका दुर्दैवी घटनेने झाला.

घटनेच्या रात्री सुजित आपल्या आजी-आजोबांसोबत झोपलेला असताना आरोपी विलासने तिथे येऊन त्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. या वादाचे पर्यावसान काही वेळातच भीषण हल्ल्यात झाले; विलासने संतापाच्या भरात आपल्याकडील चाकूने सुजितच्या पोटावर सपासप वार केले. या रक्तरंजित हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सुजितचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

खामसवाडी गावात भररात्री घडलेल्या या थरारक प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, जमिनीच्या हव्यासापोटी सख्ख्या चुलत्यानेच पुतण्याचा काटा काढल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी मृत सुजित शेळकेच्या आईने दिलेल्या जबाबावरून शिराढोण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपीला जेरबंद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. रक्ताच्या नात्यात जमिनीच्या वादातून घडलेल्या या भीषण हत्याकांडाने संपूर्ण गाव हादरले आहे.

# 'मंगलकुंज' घोटाळा : २०० कुटुंबांची पुनर्विकासात फसवणूक




**मुंबई** : बोरिवली (पश्चिम) येथील ऐतिहासिक इंद्रप्रस्थ शॉपिंग सेंटरच्या समोरील 'मधुमिलन को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी' (मंगलकुंज) सध्या भ्रष्टाचार आणि गंभीर प्रशासकीय अनियमिततेमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ६६ वर्षे जुन्या असलेल्या या प्रतिष्ठित सोसायटीत ९० टक्के रहिवासी गुजराती भाषक असून, त्यामध्ये कच्छी जैन समाज आणि इतर गुजराती समुदायाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

मॅनेजिंग कमिटीने पुनर्विकासाच्या नावाखाली केलेल्या फसवणुकीमुळे आणि ७९ लाख रुपयांच्या टॅक्स घोटाळ्यामुळे या २०० कुटुंबांचे भविष्य आता टांगणीला लागले आहे. याप्रकरणी रहिवाशांनी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे.

सोसायटीच्या सदस्यांनी मॅनेजिंग कमिटीवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. लोकशाही आणि सहकारी संस्थांच्या नियमांना हरताळ फासत कमिटीने कामकाज चालवल्याचे सदस्यांचे म्हणणे आहे. कोणतीही सर्वसाधारण सभा (GBM) न घेता किंवा सदस्यांची अधिकृत संमती न घेताच, कमिटीने मुंबई महानगरपालिकेत (BMC) पुनर्विकासाचा एक गुप्त आराखडा सादर केला. पालिकेच्या फाईल्समधून या छुप्या कारभाराचे दस्तऐवज जेव्हा सदस्यांच्या हाती लागले, तेव्हा हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

सोसायटीचे सदस्य विरल सावला यांनी थेट सचिव देवेंद्र सयानी यांच्यावर निशाणा साधला आहे. सयानी यांनी स्वत:ला सर्वसत्ताधीश समजून हा कट रचल्याचा आरोप सावला यांनी केला. मूळ दुकानदारांना इमारतीच्या मागील बाजूस ढकलून, समोरील मोक्याची आणि कोट्यवधींची व्यावसायिक जमीन हडपण्याचा हा डाव असल्याचा दावा रहिवाशांनी केला आहे.या भ्रष्टाचाराचे पुरावे केवळ कागदपत्रांपुरते मर्यादित नाहीत, तर आर्थिक व्यवहारातही मोठा गैरप्रकार समोर आला आहे. सदस्यांकडून वसूल केलेला ७९ लाख रुपयांचा मालमत्ता कर (Property Tax) सरकारी तिजोरीत जमाच करण्यात आला नाही. या गंभीर आर्थिक अनियमिततेची दखल घेत उपनिबंधकांनी (Sub-Registrar) विद्यमान मॅनेजिंग कमिटी तत्काळ प्रभावाने बरखास्त केली आहे. तसेच, सहनिबंधकांनीही या कमिटीला कोणत्याही प्रकारचे नवीन प्रशासकीय किंवा आर्थिक निर्णय घेण्यास मज्जाव केला आहे.कमिटी बरखास्त होऊनही जुने सदस्य पडद्यामागून सूत्रे हलवत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. दरम्यान, सचिव देवेंद्र सयानी यांनी या सर्व आरोपांवर मौन बाळगले आहे. बोरिवलीसारख्या प्रमुख गुजराती बहुल भागात घडलेल्या या घोटाळ्यामुळे समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता मुख्यमंत्री कार्यालय (मंत्रालय) या बिल्डर आणि भ्रष्ट कमिटीच्या अभद्र युतीतून २०० कुटुंबांना कसा दिलासा देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० एप्रिल २०२६


## अय्युब पठाण यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्य पुरस्कार प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** पुणे येथील मधुश्री प्रकाशन संस्थेने आयोजीत केलेल्या उत्कृष्ट काव्य स्पर्धा पुरस्कार २०२६ च्या उत्कृष्ट कविता स्पर्धामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांची वास्तववादी व आशयघन असलेली काव्यप्रतिभेची कविता "दान दे "या कवितेला राज्यस्तरीय उत्कृष्ठ काव्य पुरस्कार मिळालेला आहे." नांदत्या हिरव्या रानातपिकांना तू जीवदान दे !माणिकमोती पिकण्यासहे ! नभा, भुईला दान दे...! या निसर्गाची प्रार्थना असलेल्या " दान दे " या कवितेला उत्कृष्ट काव्य पुस्कारा २०२६ चा सर्व कवितेतून चांगला क्रमांक आलेला असून मधुश्री प्रकाशनचे आयोजक पराग रघुनाथ लोणकर आणि अध्यक्षा तथा परीक्षक श्रीमती कविता मेहेंदळे यांनी नुकतेच अय्युब पठाण लोहगावकर यांना मानाचे प्रशस्तिपत्र पाठवून श्री. पठाण यांचे अभिनंदन केले आहे.

## बापूराव पाटील यांच्या हस्ते गणेश नगर येथे सीएनजी पंपाचे भूमिपूजन



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** पर्यावरणपूरक इंधनाला प्रोत्साहन देण्याकरिता आणि वाहनधारकांची सोय करण्यासाठी अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्त आणि महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीचे औचित्य साधून गणेश नगर, ता. उमरगा येथे रविवारी (ता. १९) रोजी नूतन सीएनजी पंपाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या सीएनजी पंपाचे भूमिपूजन जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या शुभहस्ते विधिवत पूजन आणि कुदळ मारून करण्यात आले. यावेळी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगरसेवक गणेश अंबर, अमर भोसले, दिलीप भालेराव, रफिक तांबोळी, धनराज मंगरुळे, रशीद शेख, गोविंद पाटील, बसवराज पाटील, उल्हास घुरघुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी बोलताना शरण पाटील म्हणाले की, वाढते प्रदूषण रोखण्यासाठी सीएनजी हा एक उत्तम पर्याय आहे. हा पंप केवळ एक व्यवसाय नसून पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या दिशेने उचललेले एक सकारात्मक पाऊल आहे. पर्यावरणपूरक पाऊल, वाहन धारकांना दिलासा, सीएनजीमुळे प्रदूषणात घट, नागरिकांना स्वस्त इंधन उपलब्ध होईल. या पंपाच्या सुविधेमुळे आता स्थानिक वाहनधारकांना इंधनासाठी लांबवर जाण्याची गरज भासणार नाही. या परिसरातील नागरिकांनी या नवीन सुविधेबद्दल आनंद व्यक्त केला आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact : 9405109103 8830838903


## महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त बसव प्रतिष्ठाणच्या वतीने अभिवादन




**मुरूमत (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** अक्षय तृतीय या शुभ मुहूर्तावर संपूर्ण देशभर जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. लोकशाहीचे आद्यजनक महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील थोर समाजसुधारक होते. रविवारी (ता.१९) रोजी अक्षय तृतीय तिथीनुसार मुरूम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसव प्रतिष्ठाण अखिल भारतीय सामाजिक संघटनेमार्फत पूर्णाकृती पुतळ्याचे स्थापना करण्यात आली. नगरसेवक गणेश अंबर, शरद स्वामी, काशिनाथ मिरगाळे, नितीन शेळके, संतोष कांबळे,संजय धुमुरे,राजू मुल्ला, भगत माळी, महेंद्र गायकवाड, बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी डिंगबर सोनटक्के,गोपाळ इंगोले, महेंद्र कांबळे,विठ्ठल रामपुरे, प्रा.सादु गायकवाड,सुधीर टिकांबरे,राहुल विभुते,परमेश्वर काजळे,अशोक घोडके,गोविंद महामुनी,राजकुमार अंबुसे,धनराज शिंदे,अविनाश चव्हाण,शुभम पुराणे,अमित ढाले, आदीसह बसव भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतीवर्षीप्रमाणे यंदाही जयंतीनिमित्त एक दिवशीय पुतळा प्रतिष्ठापना करण्यात आली. राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मे महिन्यात राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. व त्याच बरोबर प्राथमिक स्वरूपात १० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे, सदर कार्यक्रमाचे आयोजन मुरूम शहरातील रत्नमाला मंगल कार्यालयात आयोजित केले जात असल्याची माहिती बसव प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी दिली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० एप्रिल २०२६

# मराठा आरक्षण विविध अंगाने तपासणे गरजेचे राज्य शासनाचे मत




**मुंबई (प्रतिनिधी) :** महाराष्ट्रात मराठा समाज अनेक मार्गाने कमकुवत होत चालेल असतांना महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षण विविध अंगाने तपासणे गरजेचे असल्याचे मुंबई उच्च न्यायालयात नमुद केले आहे.विविध आयोगाचा अहवाल ज्यात काकासाहेब कालेलकर आयोग मंडळ बापट आयोग, सराफ आयोग, खत्री आयोग, गायकवाड आयोग, सुक्रे आयोग आदींची माहिती न्यायालया समोर सादर करत मराठा समुदायाचा समावेश मागासलेल्या वर्गांच्या यादीत करावा, अशी शिफारस काका कालेलकर यांच्या पहिल्या मागासवर्ग आयोगाने केली होती. परंतु, १९५६च्या राज्य पुनर्रचना अधिनियम कलम ८च्या तरतुदीं नुसार मुंबई राज्याची पुनर्रचना केली. स्वातंत्र्यानंतर,मराठ्यांचाउत्पन्नाचा मुख्य स्त्रोत शेती हा होता.जमिनीच्या तुकड्यांचे विभाजन, शेतीतून मिळणाऱ्याउत्पन्नात झालेली घट, शेतीशी निगडित पारंपरिक प्रतिष्ठेचा -हास आणि शेतीसाठी आवश्यक संसाधनांचा अभाव यासारख्या अनेक कारणांमुळे, मराठा समाज अधिकाधिक उपेक्षित म्हणजेच मुख्य प्रवाहा बाहेर गेला. त्यानंतर १९९१ मधील आर्थिक सुधारणांमुळे मराठा समाजाच्या दुरवस्थेत अधिकच भर पडली.माजी न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस करताना या ठरावाचा मराठा समाजासह इतरही विविध समाजांवर अत्यंत सखोल परिणाम झाल्याचे नमूद केले होते.या ठरावाने सार्वजनिकसेवांमधील आरक्षणाचे निकषच नव्याने परिभाषित केले होते, असे महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांनी सांगितले.आरक्षण तर्क संगतच आणि मराठा समाजा च्या सामाजिक स्थितीचे पुनरावलोकन एम जी गायकवाड यांच्या अहवालानंतर शुक्रे आयोगाची स्थापना होण्या पर्यंत करण्या पर्यंतच्या काळात जवळपास पाच वर्षांचा काला वधी लोटला होता.मागासवर्गीयांच्या संपूर्ण यादीचे पुनरावलोकन दर १० वर्षांच्या अंतराने करण्याचे अपेक्षित असते. या पार्श्वभूमीवर मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचे पुनराव लोकन करणे हे पूर्णपणे वाजवी आणि तर्कसंगत असल्याचा दावाही महाधिवक्त्यांनी केला. या सुधारणांचे आर्थिक लाभ या समाजापर्यंत पोहोचलेच नाहीत या परिस्थितीमुळे मराठा समाजाचा मोठा वर्ग उपलब्ध होईल ते काम शोधू लागला. विशेषतः कोणत्याही शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता नसते अशी कष्टाची कामे शोधण्याच्या उद्देशाने शहरी भागांकडे स्थलांतर करण्यास भाग पडला, असा दावाही महाधिवक्तामिलिंद साठ्ये यांनी मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात दहा टक्के आरक्षण देणे गरजेचे का आहे हे न्यायालयाला पटवून देताना केला.मराठा समाजाची ही अधोगती किंवा पिछाडी केवळ स्वतंत्र व विलग घटकांच्या स्वरूपात न पाहता, ऐतिहासिक कालखंडा तील एका अखंड व सातत्यपूर्ण प्रक्रियेचा भाग म्हणून पाहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष पीठापुढे युक्तिवाद करताना सांगितले.मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिका करता ज्येष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने विधिज्ञ श्रेयश देशपांडे, विधिज्ञ मधुर गोलेगावकर,विधिज्ञ पद्मासिंह पाटील आदी कामकाज पाहत आहेत. या वेळी मराठा समाजाचे विविध जिल्ह्यातील समाज बांधव मोठया संख्येने उपस्तिथ होते त्यात प्रामुख्याने रामचंद्र शेडगे,अनिल सुर्वे,संतोष शेजवळ,सुभाष देसाई,शैलेंद्र शिंदे,सुशील निकम बळवंत गायकवाड,दिनेश पवार,संतोष दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयात मराठा समाजाच्या वतीने अनवाणी असलेले जेष्ठ अभ्यासक मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील रामचंद्र शेडगे, संतोष दळवी प्रा.अंबादास मोहिते एवढेच मान्यवर उपस्थित राहतात हे विशेष होय. भारतीय राज्य घटनेतील कलम १५ व १६ व इतर उपकलमांचा यथा योग्य अर्थ न्यायालया समोर नमुद करतांना न्यायमूर्ती अशोक कुमार यांचा न्याय निवाडा महत्वाचा असुन कलम ३४१ कलम ३४२(अ) कलम ३३८, २६(सी) दुरुस्ती या वर सखोल मांडणी करून १०२ वी घटना दुरुस्ती, कलम ३३८(बी) यावर भाष्य करणारी मांडणी करत, विशिष्ट स्थितीत ५०% आरक्षण मर्यादा ओलांडता येते हे सुद्धा पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सामाजीक व शैक्षणीक मागास वर्ग यांना शोधण्याचा अधिकार राज्य शासनास असल्याचे त्यांनी नमुद केले व ओबीसी वर्गा मधील आरक्षण, एस ई बी सी वर्गातील १०% आरक्षण आणि स्वतंत्र व वेगळे आरक्षण या वर त्यांनी दुपारी दोन वाजे पर्यंत मांडणी केली. मराठा समाज मागासच, आरक्षण देणे गरजेचे या अनुषंगाचे प्रतिपादन व मांडणी करतांना विधिज्ञ मिलिंद साठ्ये महाधिवक्ता यांनी मुंबई हायकोर्टात युक्तिवाद करतांना नमुद केले. मराठा समाज पुढारलेला असल्याचा याचिका कर्त्यांचा दावा फोल असून राज्यातील मराठा समाजात आजही मागासलेपण कायम आहे.या समाजाकडे तुच्छतेने पाहिले जाते त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देणे गरजेचे असल्याचा युक्तिवाद महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी मुंबई हायकोर्टात केला. न्यायालयाने हा युक्तिवाद ऐकून घेतला.आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तसा कायदा संमत करण्यात आला आहे. मात्र आरक्षण अवैध असल्याचा दावा करत हायकोर्टात विविध याचिका दाखल करण्यात आल्या आहे.या याचिकां वर शनिवार दि १८ एप्रिल, २०२६ रोजी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या पूर्ण पीठासमोर सुनावणी घेण्यात आली. मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून आरक्षणा बाबत त्यांनी युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयाला सांगितले की,२०१८सालच्या १०२ व्या घटनादुरुस्तीमुळे सुरुवातीला राज्यांचे मागासप्रवर्गओळखण्याचे अधिकार मर्यादित झाले होते का? असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र २०२१ च्या १०५ व्या घटना दुरुस्ती नुसार राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांना स्वतःची राज्य मागासवर्गीय यादी तयार करण्याचा आणि ती राखण्याचा पूर्ण अधिकार प्राप्त झाला त्या आधारे विविध आयोगांनी सादर केलेल्या अहवाला वरून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले. स्वतंत्र आरक्षण देण्याची गरज एससीबीसी आरक्षणात एका मोठ्या वर्गाचा समावेश होतो. त्यामुळे तिथे अनेकांनी गरज नसतानाही दावा केला.

ज्यांना खरेच गरज आहे. त्यांना आरक्षण मिळण्यात अनेक अडचणी येत आहेत म्हणूनच स्वतंत्र आरक्षण देण्याची गरज असल्याचा युक्तिवाद महाधिवक्त्यांनी केला बऱ्याच वेळेस राज्य शासनाचे जेष्ठ विधिज्ञ विजय थोरात यांनी अनेक बाबी मांडल्या.न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या न्यायालयाने पुढील सुनावणी ३० एप्रिल २०२६ रोजी निश्चित केली.

## वाचवू पाणी

वाढलाय किती
उन्हाचा पारा
पाण्याचा वापर
जपून करा

आटली विहीर
आटले तळे
पाण्याविना
सुकले मळे

दुरूस्त करा
गळणारे नळ
पिण्याच्या पाण्यासाठी
टळेल पळापळ

पावसाच्या पाण्याचे
पुनर्भरण करा
उन्हाळ्यात वाहील
खळ खळ झरा

थेंब थेंब
वाचवू पाणी
आनंद बहरेल
आपल्या जीवनी



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० एप्रिल २०२६


## का दूर पळतात माणसं?

कळत नाही मला,का दूर पळतात माणसं ?
खरं बोलल्यावर मात्र, सोडून जातात माणसं.

खरं खरं बोलताच, सोडून सारे दुर पळतात.
मनासारखं बोलल्यास, गोळा होतात इथे माणसं.

खरं बोलावं की खोटं बोलावं, हेच कळत नाही.
मनासारखं बोललं की, जुळत असतात माणसं.

हातातले सोडून सारे, पळत्याच्या मागे धावतात.
मृगजळा समान येथे, पळत असतात का माणसं.

सारेच आपापल्या धुंदीत, मती भ्रष्ट झाल्यावर.
संपत्तीच्या नशेत, कर्तव्य विसरतात की माणसं.

माणसापासून माणूस,का दूर पळताना दिसतो.
संकट आल्यास मात्र जवळीक शोधतात माणसं.

गरिबीत माणसाला, ओळख देणार नाही कोणी.
यशस्वी झाल्यावर मात्र, नाते जोडतात माणसं.

**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटरचे भव्य भूमिपूजन सोहळा पार पडला




**दौलताबाद (जावेद अहमद) :** शरणापूर अप्पवाडी येथे धम्मयान एडुकॅशन अँड चेरटीबल ट्रस्ट व महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भव्य इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटर तयार करण्यात येणार असून त्यासाठी जवळपास २६ कोटी रुपयांचे अंदाजित खर्च असून महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने २६ कोटी रुपयांचे निधी एकनाथ शिंदे व पालकमंत्री तथा समजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आले असल्याचे श्रीकांत शिंदे यांनी सांगितले आहेदि १९ रविवारी भूटान चे गृहमंत्री ल्योनपो शेरिंग,चाउना मिन उपमुख्यमंत्री अरुणाचल प्रदेश ,रामदास आठवले सामाजिक न्याय मंत्री,राजकुमार बडोले सामाजिक न्याय मंत्री,भीमराव आंबेडकर राष्ट्रीय अध्यक्ष बौद्ध महासभा, श्रीकांत शिंदे खासदार, संजय शिरसाठ पालकमंत्री, उदित लोकूभंडार श्रीलंका माजी खासदार, अर्जुन खोतकर आमदार,डॉअनिलकुमार ,सह संयोजक पूज्य भिखु एम धम्मजोती,सह सयोजक बोधिरत्न थेरो,महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, नगरसेवक हर्षदा शिरसाठ,सिध्दांत शिरसाठ,सरपंच संध्या संदीप सदावर्ते ,लक्ष्मण अप्पा लिंभारे तसेच ग्रामस्थ व उपासक उपसिका,इश्वर लिंभारे आदी ग्रामस्थ उपासक व उपासिका उपस्थित होतेतीन एकर जागेत भव्य साधना केंद्र,महाराष्ट्रातील मोठे केंद्र,२०० भिकू मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्यासाठी उपलब्ध असतील, जगभरातील उपासक येथे येतील असे भिकू एम धम्मजोती यांनी सांगितले आहे

## दिलीप गायकवाड मराठवाडा उपाध्यक्षपदी नियुक्त



**कन्नड (अरुण थोरात) :** महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर सेना यांच्या वतीने संघटन बळकटीसाठी नवीन नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. संघटनेचे राज्याध्यक्ष शिक्षक आ. किशोर दराडे यांच्या नेतृत्वाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत दिलीप गायकवाड यांची मराठवाडा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या माध्यमातून संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी संघटनेच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103


# डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले जयंतीनिमित्त चर्चासत्र व पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक समता, मानवता आणि सत्यशोधक विचारांची परंपरा अधोरेखित करणारा ऐतिहासिक उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेला डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले जयंती उत्सव, चर्चासत्र व पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.प्रमुख भाष्यकार प्रा. सुदाम चिंचाणे यांनी आपल्या भाषणात लेखक राजाराम सूर्यवंशी यांच्या संशोधनकार्याचा उल्लेख करत सांगितले की, त्यांनी वीस वर्षांच्या अभ्यासातून डॉ. यशवंतराव फुले व चंद्रभागाबाई यांच्याबाबतचे अनेक गैरसमज दूर केले आहेत. त्यांच्या 'डॉ. यशवंतराव जोतीराव फुले यांचे चरित्र' या ग्रंथात चंद्रभागाबाईंच्या "बेवारस मृत्यू" संदर्भातील आरोप सप्रमाण खोडून काढण्यात आला असून त्या सवारस निधन पावल्याचे नव्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे. हा इतिहास समजून घेण्यासाठी संबंधित ग्रंथाचा अभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी फुले दांपत्याच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, त्यांनी भारतीय समाजाला समतेचे व नवजागरणाचे भान दिले. पहिला आंतरजातीय सत्यशोधक विवाह घडवून आणत महात्मा जोतीराव फुले यांनी सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. तसेच आपल्या मृत्युपत्रातील मूल्यांनुसार डॉ. यशवंत फुले यांनी संपूर्ण आयुष्य जगत सत्यशोधक चळवळीचा वारसा पुढे नेला. परिवर्तनाच्या दृष्टीने त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असून ते समजून घेणे काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमात महात्मा जोतीराव फुले यांचे दत्तक पुत्र डॉ. यशवंत जोतीराव फुले यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. प्लेगसारख्या भीषण साथीच्या काळात त्यांनी केलेल्या वैद्यकीय सेवेचा उल्लेख करत उपस्थितांनी त्यांच्या समाजसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी समाजहितासाठी नि:स्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. संग्राम मौर्य आणि डॉ. अनिल धुळे यांना "डॉ. यशवंत सावित्रीमाई जोतीराव फुले पुरस्कार" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांना नवी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब जाधव हे होते त्यांनी समाजातील सत्यशोधक विचारधारेवरती चालणाऱ्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आजच्या वर्तमान परिवेशात नेमके कोणत्या पद्धतीचे कार्य करावे यावर विचार मंथन करून तसा कृती कार्यक्रम द्यावा असे प्रतिपादन केले.कार्यक्रमादरम्यान लेखक राजाराम सूर्यवंशी यांच्या डॉ. यशवंत फुले यांच्या चरित्रग्रंथावर सखोल चर्चासत्र आयोजित करण्यात आले. सहभागी वक्त्यांनी सत्यशोधक चळवळीतील त्यांच्या कार्याचा अभ्यासपूर्ण आढावा घेत आजच्या काळातील त्यांची उपयुक्तता अधोरेखित केली.भारतीय पिछडा शोषित संघटन, नवी दिल्ली आणि सत्यशोधक शिक्षक सभा, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन वसंत हारकळ यांनी केले.

मानपत्राचे वाचन देवराज दराडे आणि डॉ. नवनाथ गोरे यांनी केले. जनार्दन कापुरे, कल्याण रंधे, विश्वनाथ कोक्कर, शरद बोरसे, अंभोरे सर, एन. आय. काळे आदी कार्यकर्त्यांची व अनेक शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.समाजातील सर्व घटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल आयोजकांनी आभार मानले.

# सेवापूर्ती सोहळया निमीत्त वाकद येथे शेतकरी मेळावा संपन्न




**कन्नड (अरुण थोरात) :** वाकद ता.कन्नड येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय व मातोश्री बबाई शेतकरी उत्पादक कंपनी वाकद यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळावा व जिल्हाअधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांचा सेवापुर्ती समारोह आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री देशमुख यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी पीक फेरपालट आंतरपीक,पारंपारिक बियाणाचा वापर, रासायनिक खताचा कमी व संतुलित वापर, कीटकनाशकांचा कमी वापर, जास्त पाण्याची आवश्यकता असणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्याची आवश्यकता असणाऱ्या पिकाचे उत्पादन, एल निनो मुळे मान्सूनचा पाऊस कमी होऊन दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दर्शवली, अशा परिस्थितीत पिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हवामान अनुकूलन शेती चा सल्ला दिला. तसेच कन्नड तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट यांनी पीएम-प्रणाम योजना अंतर्गत रासायनिक खतांचा (युरिया, डीएपी, एनपीके) अतिवापर कमी करणे आणि त्याऐवजी सेंद्रिय किंवा पर्यायी खतांचा वापर वाढवणे याबाबत मार्गदर्शन केले तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्च कमी करून पिकाचे उत्पादन वाढवण्या चा सल्ला दिला व विविध शासकीय योजना व महाविस्तार एआय ॲप बद्दल विशेष मार्गदर्शन केले व क्षेत्रीय अधिकारी यांना सूचना देऊन उपस्थित शेतकऱ्यांच्या मोबाईल मध्ये महाविस्तार प्रत्यक्ष डाऊनलोड करून घेतले.

यावेळी सिल्लोड उपविभागाचे कृषी उपसंचालक एस.बी आघाव, मातोश्री बबन शेतकरी उत्पादक कंपनीची चेअरमन बबलू मनगटे व कंपनीचे सदस्य, म.कृ.अ. आर.व्हि. डोंगरदिवे, कार्यक्रमांचे सुत्रसंचालक उपकृषी अधिकारी दीपक बीरारे, स.कृ.अ श्री भोकरे, श्री राठोड, श्री पवार, श्री वेळे तसेच आत्माचे ठाकरे, श्री रहाणे, श्री शेळके तसेच गावातील महिला शेतकरी उपस्थित होते.

# घाटी रुग्णालयाला १२ व्हिलचेअरची सामाजिक भेट



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मिटमिटा येथील सामाजिक कार्यकर्ते किसन कनिसे यांनी आपल्या दोन स्वर्गीय भाऊ धनराज कनिसे व कन्हैया कनिसे यांच्या समरणार्थ घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल असणाऱ्या रुग्णांना ईतर कक्षात येण्याजण्या साठी अक्षय तृतीया या पावन मुहूर्तावर दि १९ रविवारी बारा रुग्ण खुर्ची व्हील चेअर गरजवंताला उपलब्ध करून दिली पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या प्रेरणेने हा उपक्रम साजरा करण्यात आला. नगरसेवक सिध्दांत शिरसाठ ,माजी महापौर अशोक सायना यादव, राखमाजी जाधव, संतोष आम्ले, देवा सलामपुरे,संजय तायडे,डॉ सुरेश हरबडे,डॉ सलमान शेख,डॉ पुष्पेंदर निकुंभ, डॉ तपण जकल यांच्या हस्ते व्हील चेअर चे लोकार्पण करण्यात आलेयावेळी चेतन तायडे, दीपक बनकर,राहुल यलदी, दीपक ढाकणे,नंदकुमार म्हस्के,डॉ शिवाजी गायकवाड,डॉ सुरेश हरबडे,वैशाली बोडखे, चंदकला उगले ,भारती राठोड, विशाल दाभाडे, सोनू साबळे, गणेश कांबळे, भिकन मुळे, दिलीप जाधव, लक्ष्मण बनकर, बबन मुळे,बाबा तायडे, सरपंच बाळू येटकर,दादाराव लोखंडे, विष्णू क्षत्रिय,नामदेव सोनवणे, अक्षय सोनवणे


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com